श्री साईनाथ प्रसन्न.

# श्री साईलीला

## मासिक पुस्तक.

वर्ष १ लें. ] पौष शके १८४५ [ अंक ११ वा.

नलिनीदलगत जलमतितरलम् । तद्वज्जीवनमतिशय चपलम्॥



क्षणमपि सज्जन संगतिरेका । भवति भवार्णव तरणे नौका ॥
श्री शंकराचार्य.

संपादकः—लक्ष्मण गणेश महाजनी.
प्रकाशकः—रामचंद्र आत्माराम तर्खड
श्री साईलीला कचेरी ५ टर्नर रोड बांद्रा, बी. बी. रेल्वे.

# अनुक्रमणिका.


| | |
|---|---|
| महाराजांचे अनुभव ... ... ... | ८६-९३ |
| महाराजांची बोधपद्धति ... ... ... | ७-८ |
| स्फुटविषय ... ... ... | ७५-८४ |
| श्री साईसच्चरित ... ... ... | २१७-२३६ |


## खुलासा.

श्री साईलीलेच्या पृष्ठावर जे अंक देण्यांत येतात त्यासंबंधीं कांहीं वाचकांचा गैरसमज होत आहे असें दिसतें. पृष्ठावरील अंक निरनिराळ्या विषयाला निरनिराळे दिले आहेत. हेतु हा कीं शेवटीं पुस्तकें बांधतांना विषयवारीप्रमाणें तीं बांधवितां यावीं. या व्यवस्थेमुळें पृष्ठावरील अंकांत विषमता दिसल्यास म्हणजे २६ पृष्ठापुढें ४२ वें पृष्ठ आल्यास मधलीं २७ ते ४१ पृष्ठें आपल्याला कमी आलीं किंवा पृष्ठांक चुकीचे पडले आहेत असा समज वाचकांनीं करून घेऊं नये.

---

## विनंति.

श्री साईलीलेचे अंक दर महिन्यास शुद्ध ११ पर्यंत सर्व पोष्टांत पडतात व ते ग्राहकांना दर महिन्यास पौर्णिमेपर्यंत बहुतेक पोहोंचले पाहिजेत. पोष्टांत क्वचित अंक गहाळ होत असतील, व त्यामुळें जर ग्राहकांनीं अंक न मिळाल्याची तक्रार पौर्णिमेपर्यंत आमचेकडे केली तरच त्यांना पुन्हां अंक पाठविण्यांत येईल. कित्येक ग्राहकांची एखादा अंक न मिळाल्याची तक्रार २।३ महिन्यानीं उशिरां येते. इतक्या उशिरां पुन्हां अंक पाठविणें अशक्य असल्यामुळें ही सूचना देणें भाग पडत आहे.

---

श्रीसाईलीला मासिकाची वार्षिक वर्गणी तीन रुपये. टपाल हांशीलसह तीन रुपये सहा आणे. व्ही पी. नें तीन रुपये आठ आणे. फुटकळ अंकास पांच आणे.

(५२)

एकदां बापुसाहेब जोगांना विंचू चावला त्या वेळेला सुमारें रात्री ८ वाजले होते. ते तावडतोब महाराजांकडे गेले. पायरी चढत असतांनाच महाराज म्हणाले "बापूसाहेब काय आहे?" बापुसाहेब म्हणाले "बाबा मला विंचू चावला" महाराज म्हणाले "बरें होईल, जा." बापूसाहेब तसेच पायरीवरून परत फिरले; ते कंपौंडाचे बाहेर गेले नाहींत तोंच वेदना अजिबात बंद झाल्या.

(५३)

रा. रा. वासुदेव सिताराम रातांजनकर रा. हैदराबाद रेसिडेन्सी घर नं० १६३ यांचे रा. रा. हरी सिताराम दीक्षित यांना ता. १८।८।२१ रोजीं आलेल्या पत्रांतील उतारा:—प्रथमतः साई महाराजांचे नांव व महात्म्य माहित झालें तें कुशाभाऊ (वे. शा. सं कृष्णनाथ बुवा मिरजगांवकर जोशी) यांचेकडोन सन १९०८ चे सुमारास झालें. बऱ्याच ठिकाणीं लोक रा. कुशाभाऊंना पुजेकरितां घरीं बोलवीत व आदर व्यक्त करीत; ह्याप्रमाणें बरेच दिवस गांवांत क्रम चालला होता. त्यांची पूजा एक दिवस वे. शा. सं. सीतारामभटजी घटे यांचे येथें करविली होती. अर्थात ते मातुल असल्यामुळें तेथें जाण्याचा व पूजा समारंभ पहाण्याचा योग आला. त्यांच्या तीर्थप्रसादानें कांहीं भक्तांस गुण आला अशी चर्चा चालत असे. व सहजी मनांत आले कीं, साईमहाराजांचे पाय आपले घरीं लागावे. (अर्थात त्यांचे शिष्याचे) पूजा करवावी, वगैरे विचार मनांत येतात तोंच महाराजांनीं (श्रीकृष्णनाथांनीं) हंसून स्फूर्तीनें सांगितलें कीं, "मला उद्यां तुझे घरीं येणें आहे." असें वाक्य निवतांच मनास समाधान वाटलें व दुसरे दिवशीं त्यांच्या पूजेची व्यवस्था कशा रीतीनें ठेवावी ह्या विचारांत तल्लीन होऊन घराकडे रवाना झालों; व सर्वांना घरीं ही हकीगत कळविली. समाधान वाटलें. दुसरे दिवशीं उजाडण्याचे सुमारास आमच्या मातुश्री गंगाबाई ह्यांना

स्वप्न पडलें व "एक भगवा वेषधारी कमंडलू वगैरे असलेला महात्मा आला तो थेट घरांत आला. त्यांना आसन देऊन बसविण्या-करितां मातोश्रीनें आसन पुढें केलें व त्यांवर ती मूर्ती पुढें उभी राहिली. मातोश्रीनें त्यांचे चरणावर डोकें ठेविलें, तोंच त्या एकदम जाग्या झाल्या. लगेंच तें स्वप्न त्यांनीं सर्वांना कळविलें, पण त्याकडे इतकें कोणाचें लक्ष वेधलें नाहीं. असो, त्याच दिवशीं पुन्हां पूजा पहाण्यास मातुलगृहीं गेलों. तेथील पूजा वगैरे संपतांच महाराजांनीं ( श्रीकृष्णनाथांनीं ) तीर्थ प्रसादाचे वेळीं सर्वांना तीर्थप्रसाद देतांना माझी पाळी आली; तेव्हां मी तीर्थप्रसाद घेऊन उठते वेळीं महाराजांनीं पूजेंतील साईमहाराजांचा फोटो एकदम उचलून घेऊन माझे हातीं दिला, व ह्याची रोज मनोभावें पूजा करीत चल, असें सांगून परवानगी दिली. तो फोटो घेऊन घरीं आलों. त्यानंतर सकाळीं पडलेल्या स्वप्नाचा मेळ घालून मंडळीस बरेंच समाधान वाटलें. पुढें पुन्हां रा. कुशाभाऊ (श्रीकृष्णनाथ महाराज)भोज-नास घरीं बोलावून त्यांची पूजा करविली. अशा तऱ्हेनें साधारण: साईंचे नांवाची माहिती झाली. त्यानंतर बरेचसे लोक जाऊन येत व आपापला अनुभव चमत्कार दृष्टांत वगैरे निवेदन करीत तसें आपणही एकदां जाऊन समर्थांचे दर्शन घेऊन कृपा संपादन करून पुण्य जोडावें अशी भावना होऊं लागली. मला २।३ वर्षें तशा तऱ्हेचा योग जुळून आला नाहीं; पुढें १९१२ सालीं मुंबईस सम्राटागमनाचे प्रसंगीं शिर्डीस जाण्याचा योग एकाएकी जुळून आला. तो असा कीं, रा. शिव-दास घाटे यांनीं प्रात:कालीं कोपरगांवचें एक तिकीट सहज (त्यांचे कोणी जाणाऱ्याचा बेत रहित झाला म्हणून ) आणून दिलें. ती साई-महाराजांची आमंत्रण पत्रिका समजून त्याच दिवशीं सायंकाळीं निघ-ण्याचा बेत केला व निघालोंही, व मुंबईस सम्राटदर्शनास न जातां श्रीसाई महाराजांचे दर्शनास शिर्डीस गेलों तेथें बरेच अनुभव व दाखले आले त्यानंतर त्यांचेवर पद्यें करावीसें वाटल्यावरून एक पद्यमाला तयार केली. त्या नंतर एक मोठा चमत्कारिक प्रसंग व अनुभव आला तो खरोखरीच अपूर्व होता. त्याची सर्व हकीगत बरीच चमत्कृतिजन्य आहे तरी संक्षिप्तांत देत आहे; ती:—

कै. दामोदर रंगनाथ जोशी देगांवकर यांची कन्या कै. सौ० मालणबाई (ही माझी मावस बहीण लागते) ज्वरानें बरेच दिवस आजारी होती व त्यांतच ज्वर आंगांत मुरून क्षयावर घालविलें बरेच डाक्तर, वैद्य व इतर सटरफटर उपाय करूनही कांहीं गुण आला नाहीं. आतां अखेर उपाय म्हणून रोज बाबांची उदी देण्यास सुरवात केली व औषधही चालू होतें पुढें ती मुलगी औषधास कंटाळून अगदींच औषध घेईनाशी झाली व तिनें एकच हेका धरिला कीं, "मला साईबाबांचे दर्शनास घेऊन चला त्याशिवाय मी बरी होणार नाहीं." प्रकृति फारच क्षीण. उठून बसवणें फारच हलाकीचें झालें होतें. अशा स्थितींत दूर प्रवासात नेणें फारच घातुक म्हणून नेण्यास कोणी धजेना. अखेर डाक्तरचे व वैद्याचे सल्ल्यानें मनोभावनेनें गुण आल्यास पहा; कदाचित् येईलही म्हणून त्यांनीं परवानगी दिली, व असाध्य कोटींत गेलेला रोग; तेव्हां कांहीं झालें तरी केवळ तिची इच्छा म्हणून जाण्याचा बेत केला. दोघें तिघें मंडळीबरोबर घेऊन रवाना केलें. तेथें बाबांचें दर्शनास नेल्यानंतर शिव्या देण्याचा सपाटा बाबांनी सुरू केला व तिला घोंगडयावर टाक व मडक्यातलें पाणी पाजून पडूं दे म्हणून सांगितलें. ७।८ दिवस अन्न न खातां नुसत्या पाण्यावरच राहिली व तिची मात्र मी बरी होईन तर बाबांचें कृपेनेंच अशी पूर्ण श्रद्धा होती. ७।८ दिवसांनंतर पहाटच्या सुमारास तिचें देहावसान झालें व सर्व जण शोकग्रस्त झाले. त्याच सुमारास बाबांची उठण्याची वेळ झालीतरी बाबा उठत ना. काकड आर्तीस गेलेली मंडळी सकाळीं ८ वाजेपर्यंत तेथेंच तटस्थ होती व आज हा काय प्रकार व बाबा कां उठत नाहींत याची चर्चा आपआपले परीनें मंडळी करूं लागली. इकडे मृत मुलीच्या पुढील व्यवस्थेकरतां कांहीं मंडळी गुंतून गेली होती व मुलीची आई व माझ्या मातोश्री ह्या शोक करीत तेथेंच बसून होत्या व साठे काका म्हणून एक साईभक्त त्यावेळीं तेथें होते त्यांनीही त्यांचें शांतवन करण्याचा बराच प्रयत्न केला. इतक्यांत एकाएकी मुलीची हालचाल दिसून, तिनें एकदम जांभई देत डोळे उघडले व घाबरलेसें करून चोहोंकडे पाहूं लागली. झालें सर्व आनंदमय झालें व तिनें पुढीलप्रमाणें हकीगत सांगण्यास सुरवात

केली कीं, एक काळा माणूस मला घेऊन जात असतांना मी घाबरून बाबांना हाक मारली तोंच हातांत सोटा घेऊन बाबांनीं त्याला खूप मारला व त्यांचकडून मला सोडवून आपले चावडींत घेऊन गेले. तेथें असलेला प्रकार व आरास मुलीनें मुळींच पाहिला नसतानां यथातथ्य सांगितला. हा प्रकार इकडे चालू असतांना चावडींत बाबा अजून निजलेले कां आहेत, म्हणून चर्चा चालू होतीच. तों एकदम ते मोटयानें ओरडत व सोटा आपटीत जागे झाले व तेथून पळत मुलगी ज्या ठिकाणीं राहिली होती ( दीक्षीतांच्या बंगल्यांत ) तिकडे पळत आले, त्याबरोबर सर्व लोकांचा जमावही होताच तो इकडून ही हकिगत कळविण्याकरत बाहेर जाणार तोंच समोर बाबा येत होते. अशा तऱ्हेनें आनंदमय प्रभूनें सर्वस्वी आनंद करून त्या दिवशीं खरोखर मृत्युलोकांत अपूर्वता घडवून आणून भक्त कैवारी दुसऱ्याचे संकट कसें निवारण करतो ह्याची साक्ष पटविली, वगैरे वगैर अनेक लहान मोठे चमत्कार बरेच आहेत. विस्तारास्तव पुरें करितों.

## रा. रा. कृष्णराव नारायण पल्लकर यांचे रा. रा. हरी सिताराम दीक्षित यांजला आलेलें पत्रः—

मुक्काम हर्दा, ता. १७ फेब्रुवारी १९१५.

रा. रा. काकासाहेब दीक्षीत मु॥ मुंबई स्वामीचे सेवेशीं शिरसाष्टांग नमस्कार वि. वि. आपलेकडून रा.रा. सदूभय्या सो॥ यांचेकडे पत्र आलें, व त्यानंतर श्री समर्थ यांचा फोटो घेऊन श्री बाळक रामजी व श्री मुक्तारामजी आले व त्यांचे आज्ञेप्रमाणें लघुरुद्र वगैरे होऊन समर्थांच्या फोटोची स्थापना रा. सदूभय्या साहेबांचे घरीं झाली. त्यानंतर बाबांचा प्रसाद होऊन उत्सव समाप्त झाला. ज्या दिवशीं स्थापना झाली, त्याच दिवशीं रात्रीं माझे कुटुंबास व माझे चुलत बंधु ती॥ नारायण दादा जिंजगांववाले या दोघांस खालीं लिहिल्याप्रमाणें दृष्टांत झाले. ति॥ नारायणदादास दृष्टांत झाला तो असा कीं, ते शिरडीस समर्थांकडे उभे आहेत व समर्थ म्हणतात कीं, आम्ही हरद्यास जातों तुम्ही आम्हांबरोबर चला व उभयतां कोपरगांवांस गोदेच्या तटीं आले ( म्हणजे शिरडीकडील बाजू ) व काठांवर उभे राहीले. गोदेंत पाणी साधारणपेक्षां जास्त दिसूं लागलें. काठावर जेथें उभे राहिले तेथें दोन्हीकडे दोन गव्हांची पोती तोंडें उघडीं केलेलीं ठेवलीं आहेत. नंतर समर्थ ति. नारायणरावास ह्मणाले कीं, 'आतां कसे जाणार ?' इतकें म्हणतांच आसपास दहा नंदीबैल त्यावर सामान कसलेले उभे राहिलेले दिसले, व समोर पाण्यांतून पक्का रस्ता झालेला दिसला. नंतर हरद्यास माझे घराचे खुंटापासून रा. सदूभय्याचे घराचे खुंटापर्यंत जेथें निशाण लावलें आहे, तेथपर्यंत श्री समर्थ त्या सर्व नंदीबैलांसह गेले व पुढें नाहींसे झाले.

दुसरा.—माझे कुटुंबास असा दृष्टांत झाला कीं, रा. रा. माधवरावजी हातांत ताट घेऊन त्या ताटांत एक नारळ एक खण व कुंकवाची पुडी

असें घेऊन आले व कुटुंबास म्हणाले कीं, ही बाबानें तुम्हास ओटी पाठविली आहे. असे दोन्ही दृष्टांत झालेले आपणास कळविले आहेत. श्री बालक रामजी व श्री मुक्तारामजी येथेंच आहेत. येथें रोज पूजा आरती दोन्ही वेळ आनंद होत असतो. आपल्या कृपेनें समर्थांचें दर्शन व दृष्टांत व प्रसाद मिळाला. त्यावेळीं आपण याल अशी फार आशा होती. परंतु आपलें पत्र आल्यावरून आपलें न आल्याचें कारण समजलें. आतां कधींतरी समर्थ आपणास हरदयास पाठवितील अशी खास उमेद झाली आहे. समर्थांचीं आज्ञा झाल्यावरून रा. सदूभय्या शिरडीस गेले आहेत. आज त्यांना दहा दिवस झाले. इकडील सर्व मंडळी समर्थांच्या कृपेनें खुशाल आहेत. हमेशा पत्र पाठवून समाचार घेत जातील. कळावें लोभ असावा ही विनंती. सौ. माबीसाहेब यांजला माझा नमस्कार कळवितील.

आपला

कृष्णराव नारायण परुळकर.

## रा. रा. सदाशिव धुंडिराज उर्फ सदूभय्या नाईक राहणार हर्दा यांच्या ता० ६।३।१९ चे पत्राची नक्कल

श्री समर्थ नैवेद्य रविवारीं झाला व दुसरे दिवशीं म्हणजे सोमवारीं तारीख १५ फेब्रुआरी रोजीं श्रीमंत रा. रा. छोटू भैय्यासाहेब परुळकर यांचे घरीं उभयतां बंधूसह श्रीचा प्रसाद घेऊन नंतर श्री बालक रामजी रा. नथुभय्या सरमंडळ व रा. रा. शंकरभैया ( छोटूभैयांचे धाकटे बंधु ) सह नेमावर श्री नर्मदाकाठीं येथें जाण्यास रवाना झाले व श्री मुक्तारामजी माझे गांवीं ( बम्हनगांव ) रा. छोटूभय्या परुळकरासह रा. नारायणराव परुळकर जीनगांवकर यांचेसह रवाना झाले. माझे गांवीं की,

श्री मुक्तारामजी व मंडळीसह सुमारें दोन वाजतां दुपारी जाऊन पोहों-चलों. श्री मुक्तारामजी गांवीं पोहोंचतांच दर्शनाकरतां बरीच मंडळी जमली. तीन साडेतीन वाजेपर्यंत मंडळी दर्शन घेऊन गेली. सरासरी बाराचा अंदाज असेल, मी व श्री मुक्तारामजी व रा. नारायणराव पळ-ळकर जीजगांवकर बोलत बसलों असतां एकाएकीं माझ्या हातीं श्रीचा दांत कोरण्याची काडी आली. ती पाहतांच सर्व गुरुबंधूंस दाखविली. श्रीचा खेळ, व चमत्कार पाहून मनास मोठा आनंद झाला व हा चम-त्कार आपले चरणीं सादर करावा. परंतु श्री मुक्तारामजी जास्त दिवस न राहतां लगेच दुसरे दिवशीं मंडळीसह म्हणजे मंगळवारीं सातचे सुमारास रा. पळकरसाहेब यांचे बागांतून श्री समर्थ चरणाजवळ गेल्यानंतर कपडे काढून खालीं जातों तों वरांतील मंडळीनें कळविलें कीं, श्री क्षेत्र शिर्डीहून रा. माधवराव देशपांडे यांचें पत्र आज आलें. मी पत्र लगेच हातीं घेऊन श्रीचा प्रसाद देऊन माडीवर श्री चरणा-जवळ बसून पत्र वाचलें व श्री मुक्तारामजीस व सर्व मंडळीस वाचून दा-खविलें. पत्रांतील मजकूर माधवरावजींचे हातचा होता तो येणेंप्रमाणें " आपल्यास पत्र देखत साई महाराजांनीं बोलाविलें आहे, हें तारेप्रमाणें पत्र पाठविण्यास सांगितलें. तरी अर्जंट पत्र पहातांच एकटे निघून यावें. येथें येऊन काम असल्यास तावडतोब परत जावें, परंतु पत्र पहातांच यावें असे साईमहाराजांनीं सांगितलें आहे" वरील पत्र वाचतांच श्री समर्थ आरती फराळ वगैरे करून बारा वाजतां श्री मुक्तारामजीसह स्टेशनवर गेलों. श्री मुक्तारामजी मनमाडपर्यंत बरोबर आले. नंतर म्हणाले कीं, "मी हयांस परत जाईन पुढें चलण्याबद्दल श्री आज्ञा नाहीं" "तुम्ही एकटे जा." नंतर हयांस रा. पळकर यांस तार दिली व टिकीटांचे रुपये देऊन मी गाडींत बसलों व ३ चे सुमारास श्री क्षेत्र शिर्डीस पोह-चलों. वाड्यांत सामान ठेविलें.

श्रीमंत बापुसाहेब बुटी तेव्हां झोंपले होते. तेथें श्रीचरणाजवळ ५ मीनिटें विसावा घेऊन माधवरावजी देशपांडे यांस भेटण्यास त्यांचे घरीं बरोबर फुलांचा हार घेऊन गेलों, तेव्हां प्रिय बंधु ( माधवरावजी ) विष्णु सहस्रनामाचा पाठ करीत बसले होते. त्याच क्षणीं मला बरोबर घेऊन ते श्रीदर्शनास मशीदींत गेले. मी श्रीचरणीं साष्टांग नमस्कार घातला व बरोबर आणिलेला हार श्रींच्या गळ्यांत घातला व चरणसेवा करित बसलों. पांच मिनिटांनीं मला अर्धा नारळ व एक पेढा देऊन खाण्यास सांगितलें नंतर मला वाड्यांत घेऊन जाण्यास माधवरावजींस सांगितलें वाड्यांत आल्यावर स्नान केलें व रा. काकाचे खानावळींत श्रींचा प्रसाद घेतला. भोजन झाल्यावर श्रीमंत रा. बापुसाहेबाबरोबर श्रीसमर्थ लीला बोलत बसलों. दुसरे दिवशीं बडे बाबा डाक्तर पिळे वगैरे मंडळी श्रीसमर्थ लीला ऐकावी म्हणून म्हणाले.समी ह्य हकिगत आपल्या-पत्रापासून शिर्डीस दाखल होईपर्यंत विदित केली. पुढें ही लीला ऐकून श्रींनीं काय व कशी वृत्ती पालटली तें सर्व खुलासेवार रा. देशपांडे यांनीं लिहून कळविलेंच आहे.

---

मला श्रींनीं १० दिवस ठेवून घेतलें मग रजा दिली. इकडे श्रींच्या मठांत आज ८ दिवस झाले श्री मुक्तारामजी व बाळकराम उभयतां बंधू आहेत. नित्य श्रींची सकाळ संध्याकाळची आरती व काकडारती चालू आहे. आरतीस बरीच मंडळी गोळा होत असते. उभयतां बंधूंस माझेच घरीं राहण्याची श्री समर्थ आज्ञा झाली आहे, अशा रीतीनें हरदा श्री क्षेत्र शिर्डीच करून ठेविलें आहे.

( ३ )

एकदां बाळासाहेब भाटे व मी आमच्या वाड्यांत श्रीएकनाथी भागवत वाचीत असतां श्री. बापुसाहेब बुटी महाराजांकडून निरोप घेऊन आले कीं, महाराजांनीं मजजवळून साडेसोळा रुपये मागितले आहेत. महाराजांनीं बापुसाहेबांना बजाविलें कीं साडे सोळा आण, नुस्ते सोळा आणूं नकोस महाराजांनीं असेंही सांगितलें कीं "काकाजवळ बैस आणि तो काय सांगतो तें ऐक." बापुसाहेबांनीं ही सगळी हकीगत आम्हाला सांगितली त्यावेळीं मजजवळ महाराजांनीं दिलेल्या एक रुपयाशिवाय कांहीं नव्हतें, तेव्हां हा मजकूर महाराजांचे चरणीं सप्रणाम निवेदन करा, असें मी बापुसाहेबांस विनविलें आणि त्यांना असें म्हटलें कीं, ज्याअर्थी आपणाला मजजवळ बसून ऐकण्याची आज्ञा झाली आहे, त्याअर्थी आपण मजजवळ बसा आणि मी भागवत वाचीत आहें तें ऐका. ते "बरें" म्हणाले आणि बसले. आम्ही भागवत पुढें वाचूं लागलों तोंच "कायेन वाचा×××" हा श्लोक निघाला. भागवत धर्माचा प्रश्न जनक राजानें विचारला असतां त्या धर्माचें विवेचन तेथें आलेल्या ब्रह्मनिष्ठ नऊ भावांपैकीं ज्येष्ठ जो कवि यानें केलें, त्या विवेचनाचें सोलीव सार या श्लोकांत आहे. हा श्लोक आपल्या सर्वांच्या नित्य पाठांतला आहे तो असा—

"कायेन वाचा मनसेन्द्रियैर्वा । बुद्ध्यात्मना वाऽनुसृतस्वभावात् ॥
करोमि यद्यत् सकलं परस्मै । नारायणायेति समर्पयामि ॥"

या श्लोकाची पदें खाली लिहिल्याप्रमाणें—

"कायेन, वाचा, मनसा, इंद्रियैः वा, बुद्ध्या, आत्मना, वा, अनुसृतस्वभावात्, करोमि, यत्, यत्, सकलं, परस्मै, नारायणाय इति, समर्पयामि"

याचा अर्थ असा—मी जें जें कांहीं कायेनें, वाचेनें, मनानें, इंद्रियांनीं, बुद्धीनें, अहंकारानें, अनुसृत म्हणजे प्रकृति स्वभावानें करितों तें सगळें पर म्हणजे श्रेष्ठ, सर्वांचे पलीकडील नारायणाला म्हणून अर्पण करितों.

या श्लोकावर एकनाथ महाराजांनीं बरीच विस्तृत आणि बोधपर टीका केली आहे. ती सबंध टीका आम्ही वाचून संपवितांक्षणींच बापुसाहेबांना महाराजांचें बोलावणें आलें आणि ते निघून गेले. अर्थात

महाराजांनी हा श्लोक व यावरील टीका ऐकण्यासाठींच बापुसाहेबांना पाठविलें हें उघड झालें. साहजिकच या श्लोकाचा आणि महाराजांनी सांगितलेल्या "साडे सोळा" रुपयांचा कांहीं तरी संबंध असला पाहिजे, असें मनाला वाटूं लागलें. आणि असा संबंध लागतो कीं काय, या दृष्टीनें श्लोक पाहूं लागलों तों त्यांत साडे पंधराची बेरीज जमली ती अशी

काया १, वाचा १, मन १, इंद्रियें १०, बुद्धि १, अहंकार १, प्रकृति ½ = १५½

ही बेरीज साडे पंधरा होते. पण महाराजांनी साडेसोळा हा आंकडा उच्चारला होता. महाराजांकडून चूक होणें शक्य नाहीं हा विश्वास पूर्ण असल्यामुळें नाथ महाराजांची टीका पुन्हां पाहूं लागलों, तों त्यांत वरील सर्वांवर ज्या तऱ्हेचें विस्तृत विवेचन होतें, त्याच तऱ्हेचें वरील श्लोकांत नसलेल्या "चित्त" यावरही होतें. अर्थात श्लोकाच्या शब्दावरून जरी बेरीज साडे पंधराचीच होत होती, तरी नाथ महाराजांच्या टीकेवरून ती बेरीज साडे सोळाची झाली, आणि महाराजांनी उच्चारलेल्या संख्येची सार्थकता पटली. नंतर, महाराजांनी उच्चारलेल्या "साडे सोळा आण, नुसते सोळा आणूं नको" या शब्दांचें स्मरण झालें व त्या अर्ध्या म्हणजे प्रकृतीवर महाराजांनी इतका जोर कां दिला, याचा विचार करूं लागलों त्यावर लगेच असें उत्तर सुचलें कीं, बाकीचीं कर्में हेतुपूर्वक होतात आणि तीं कदाचित् अर्पण होतील; पण प्रकृतिस्वभावानें जीं कर्में होतात तीं अर्पण करणें अत्यंत दुरापास्त आहे. मनुष्य निष्काम झाला कीं, हेतुपूर्वक कर्में त्याची थांबतील पण स्वाभाविक कर्में थांबणार नाहीत. तीं होतच राहतील. म्हणून अर्पण करण्याची किल्ली नाथ महाराजांनी सांगितली आहे ती अशी. मी हें कर्म केलें आणि तें भगवंताला अर्पण करितों असें नसून, भगवंतच त्याचा कर्ता आहे आणि मी केवळ निमित्तमात्र आहे. एखाद्या मुनीमानें कोट्यवधि रुपयांचा व्यापार केला तो त्याचा नसून मालकाचा आहे, तसें मजकडून जे व्यापार होतात ते माझे नसून मालकाचे म्हणजे भगवंताचे आहेत. म्हणजे निष्कामत्वाबरोबर निरहंकारत्वही आलें पाहिजे. असें झालें म्हणजे सर्व कर्में मग तीं सहेतुक असोत किंवा स्वाभाविक असोत भगवंताचींच होतील आणि माझा म्हणून कोणताही व्यापार भगवंताला अर्पण करण्याचा संकल्प करण्याचें कारणच उरणार नाहीं.

## पंढरपूर येथील श्री साईनाथ महाराजांच्या पुण्यतिथीचा उत्सव.

ह. भ. प. दासगणू महाराज यांचा मुक्काम प्रतिवर्षी विजयादशमीला श्री क्षेत्र पंढरपूर येथें असतो. कारण श्री रखुमाबाईचें मंदिरांत नवरात्रांतील दररोजच्या कीर्तनाचें काम त्यांचेकडे आहे. दास गणूमहाराजांनीं दरसालप्रमाणें यंदाही आपल्या घरीं पुण्यतिथीचा उत्सव साजरा केला. प्रथम पवमान व रुद्राभिषेक करून महापूजा केली. नंतर श्रीसाईनाथ महाराजांचे तसबिरीपुढें रा. रा. वे. शा. सं. काशीनाथ शास्त्री उंबरकर या तरुण पुराणिक बोवांचें पुराण झालें या बुवांचे पुराण आम्हीं ऐकिलें आहे. यांची पुराण सांगण्याची शैली वाखाणण्यासारखी आहे. अस्खलित व प्रेमळ वाणी, उत्कृष्ट दृष्टांतांचा साठा, भक्तिरसाचा वाहता ओघ, व सुसंगत विषय प्रतिपादन हे गुण यांचे ठिकाणीं एकवटलेले आहेत. पुराणानंतर तीर्थप्रसाद व ब्राह्मण भोजन झालें. पुण्यतिथीनिमित्त मंत्रघोष करण्यांत आला. या मंत्रघोषास निरनिराळ्या शाखेचे ६० विद्वान् ब्राह्मण आले होते. मंत्र म्हणणें दुपारीं २ वाजल्यापासून संध्याकाळीं ६ वाजेपर्यंत चालू होतें. याशिवाय पुराण चक्री झाली. चक्रीचा नियम असा आहे कीं, प्रत्येक पुराणिकानें एकेक श्लोक सांगणें. ह्या चक्रीच्या समारंभास एकंदर ४० पुराणिक आले होते. व त्यांची पुराणें संध्याकाळीं ६ वाजल्यापासून रात्रीं १० वाजेपर्यंत झाली. हें सर्व कार्यक्रम संपल्यावर उत्सवसमाप्ति झाली.

---

यंदा ज्या घरांत हा उत्सव झाला तत्संबंधींची हकीकत श्री साईभक्तांना मनोरंजक वाटण्यासारखी आहे. दर वर्षी पंढरीस यावें लागते तेव्हां तेथें एखादें लहानसें आपलें घर असावें असा विचार दासगणू महाराजांचे मनांत बरेंच दिवस घोळत होता. शेवटीं दोन वर्षांवर श्रीसमर्थांनीं त्या विचाराला मूर्तस्वरूप आणलें व चंद्रभागेजवळ एक घर आपल्या बेतास पडेल असें दासगणू महाराजांचे आढळण्यांत आलें व तें त्यांनीं घेण्याचें ठरविलें. या घराबर दुसऱ्या लोकांचा डोळा होता व तें दासगणू महाराजांस न मिळतां आपणास मिळावें म्हणून त्यांनीं अंतस्थ कारवाई पण केली होती. परंतु दासगणू महाराजांनीं हें घर पाहण्यापूर्वींच श्रीसाईनाथ

महाराजांनीं तें त्यांच्याकरतां पसंत करून, त्या घरांत आपल्या तसबिरीच्या रूपानें प्रवेश करून कबजा घेऊन ठेवला होता. तेव्हां तें घर त्यांच्या शिष्याशिवाय दुसऱ्याला कसें लाभणार? घर घेतल्यावर दासगणू महाराज पाहतात तों तेथें आपल्या गुरूंची एक मोठी तसबीर आधींच विराजमान होऊन बसलेली होती. तिच्यासंबंधीं तपास करतांना असें कळलें कीं ही तसबीर रावसाहेब म्हसकरांची आहे. रावसाहेब म्हसकर हे ठाणें जिल्ह्यांत एका मोठ्या सरकारी हुद्यावर होते. ते श्रीसाईनाथ महाराजांचे भक्त असल्यामुळें त्यांनीं ही तसबीर तिकडे असतानां आणविली होती. सदर रावसाहेब म्हसकर 'रिटायर' होऊन आपल्या गांवीं ( अंधळगांवास ) जाण्याकरितां सर्व सामानासह श्रीक्षेत्र पंढरपुरास आले. त्यांनीं आपलें सामान रा. रा. अण्णा साहेब गोगटे यांचेकडे ठेविलें त्यांत ही तसबीर होती. अण्णासाहेब गोगटे या घराच्या अगदीं शेजारीं राहातात. त्यांनीं म्हसकरांचें सामान या घरांत ठेवलें होतें. पुढें रा. म्हसकर आपले सर्व सामान, तसबिरीशिवाय, अंधळगांवास घेऊन गेले, व तसबीर नंतर टांग्यांतून नेऊं असें म्हणाले, त्या प्रमाणें २।३ वेळां ती तसबीर नेण्याचा त्यांनीं पुढें प्रयत्नही केला. परंतु आयत्यावेळीं कांहीं तरी अडचण यावी व तसबीर नेणें होऊं नये असें प्रकार झाले. व शेवटीं तसबीर तेथेंच राहिली. पुढें रा. म्हसकर-ही कांहीं दिवसानीं वारले व तसबीर राहिली ती राहिलीच. अशा रीतीनें त्या तसबिरीच्या रूपानें श्रीसाईनाथ महाराजांनीं त्या घराचा कबजा, घरखरेदी घेण्याच्या आधींच दोन वर्षे आपल्या भक्ताकरितां घेऊन ठेवला होता. या तसबिरीची नित्य पूजा अर्चा चालविण्याची व्यवस्था दासगणू महाराजांनीं करून ठेविली आहे.

## श्री संस्थान शिर्डी येथील शके १८४५ चे गुरुपौर्णिमेच्या उत्सवाचा हिशोबः—

**जमा**

| | |
|---|---|
| ५०० | श्रीमंत बुटीकडून जमा ठरावाप्रमाणें |
| १२४॥-। | श्रीची पेटी उघडली तींत आले ते |
| २६५८=। | वर्गणी |
| ८८९॥=॥. | |

**खर्च**

| | |
|---|---|
| ५ | शेन्याची किंमत |
| ८= | वटाव मोगलाई रुपयाबद्दल |
| १।= | लेबलची किंमत |
| -॥।= | प्रसादाच्या पिशव्या सोबतच्या लेबलांची छपाई |
| ८ | कोपरगांवास गाडीभाड्यासाठीं व चहासाठीं झालेला खर्च |
| १८ | उत्सवाच्या आमंत्रण चिठ्या छापल्या त्यांची छपाई |
| १९॥ | नागपुराहून हरेराम स्वयंपाकी पाठविला होता त्यांचे रेलवे भाडें |
| १२॥-॥ | गलेफाबद्दल |
| १८ | पोस्टेज |
| | ८॥= आमंत्रण चिठ्यांस |
| | ८।॥- प्रसादाच्या पिशव्या पाठविण्यास |
| | १८८॥. किरकोळ |
| | १८ |
| ७॥ | गाडी भाडें. |
| २१॥= | श्री संस्थानचा पांच दिवसांचा खर्च |
| १॥ | प्रसादाच्या पिशव्यांची व निशाणांची शिलाई |
| ३४२।=॥. | भोजन खर्च |
| ४५६॥-।. | |
| ४३३८-।. | शिल्लक. |
| ८८९॥=॥ | |

श्री० रा० रा० गणेश गोविंद नरके एम. ए. ( कलकत्ता ) यांनी दि आनरेबल मि० गणेश श्रीकृष्ण खापर्डे आडव्होकेट उमरावती यांजला पाठविलेलें पत्र

शिरडी ता. ५ नोव्हेंबर १९१८

श्री० दादासाहेब यांस

कृ० अ० शि० सा० न. वि. वि. आपण नागपूरला चि. केशवरावला ~~पाठविलेलें पत्र त्यांनी~~ इथें ती. बापूसाहेबांकडे पाठविलें व तत्संबंधीं माहिती बापूसाहेबांचे सांगण्या वरून आपणास देत आहें.

सप्टेंबर अखेर माझी पुण्याचे नोकरीची टर्म संपल्यावर मी इथें ता. २ आक्टोबरला आलों. त्या वेळीं श्रीसमर्थ अजारीच होते. ता. २८ सप्टेंबरचे सुमारास श्रीना ताप आला, व त्यानंतर सतरावे दिवशीं श्रीनीं देह ठेविला. ज्वर २।३ दिवसच होता. परंतु त्यानंतर प्रायोपवेशन केल्याप्रमाणें श्रीनीं अन्न वर्ज केलें. त्यामुळें दिवसें दिवस शरीरांत शक्ती मुळींच राहिली नाहीं. समर्थांचे कांहीं कांहीं उद्गार निर्याणसूचक होते. परंतु ते कोणाच्याच लक्षांत आले नाहींत. बाहेरील मंडळीपैकीं ज्वर आला तेव्हां फक्त काकासाहेबच इथें होते. परंतु लवकरच त्यांना आपण होऊन मुंबईस पाठऊन दिलें. पुढें समर्थांचे प्रकृतीचें वर्तमान ऐकून ते पुन्हां निर्याणाचे पूर्वी ३।४ दिवस एथें आले. १॥-२ वर्षांपासून नानासाहेब निमोणकर श्रीसमर्थांचे निकट राहून रात्रंदिवस सेवा करीत असत, हें आपणांस माहिती असेलच. ह्याशिवाय, बुटी, जोग भाटे, माधवराव वगैरे मंडळी शिरडीस होती. श्रीसमर्थांचे दिवसांतून दोन वेळ लेंडीवर, गांवांत भिक्षेला जाणें वगैरे क्रम, शरीर अगदीं विकळ होईपर्यंत चालूच होते. तसेंच चावडींत जाणें वगैरे कायमच होतें. श्रीसमर्थ फेरी वगैरेला पायांनीच जात. परंतु दोन्ही बाजूला धरणारांना ( बापूसाहेब बुटी व निमोणकर ) बहुतेक श्रीनां उचलूनच न्यावें लागे. पुढें निर्याणाचे पूर्वी १।२ दिवस ह्या फेऱ्या व सकाळची भिक्षा वगैरे बंद झाली. श्री समर्थ "चिंता करूं नका" वगैरे म्हणून सर्वांना धीर देत असत. प्रयाणाचे वेळेचा पत्ता कोणालाच लागूं दिला नाहीं. श्रीसमर्थ अखंड सावधान होते व शेवटले सेकंदापर्यंत सावध होते व धीर देत

होते. मंगळवारी ता० १५ आक्टोबरला दुपारचे आरतीनंतर बापुसाहेब काकासाहेब वगैरे मंडळींना घरोघर जेवावयास पाठवून दिलें. ही सर्व मंडळी मशिदींत श्रीसमर्थाबरोबर रोज जेवीत असत. ह्या दिवशीं अशा रीतीनें त्यांना वरोवर पाठवून आपण तिकडे इहलोक सोडून प्रयाण केलें. त्यावेळीं जवळ लक्ष्मीबाई (पाटलीण) बयाजी, भागूजी, बाळा शिंप्याचा लक्ष्मण, नानासाहेब निमोणकर व आणखीं कांहीं मंडळी हजर होती. माधवराव देशपांडे खालीं पायरीवर बसले होते. लक्ष्मीबाई पाटलीणीला खिशांतून कांहीं रुपये (९ रुपये) काढून दिले व थोड्या वेळानें म्हणूं लागले "अरे आतां मला इथें बरें वाटत नाहीं, वाड्यांत (बापूसाहेब बुटीचे दगडी वाड्याचा उल्लेख श्री "दगडी वाडा" "वाडा" ह्या शब्दानें करीत) घेऊन चला म्हणजे बरें वाटेल. हीच शेवटची आज्ञा व पुढें ह्याचप्रमाणें झालें, बयाजीचे अंगावर प्राण सोडला. श्रीसमर्थ नेहमीं प्रमाणें बसलेलेच होते. सबंध दुखण्यांत श्रीसमर्थ बसूनच असत. चाव-डींत थोडा वेळच कायतो थोडे लांब होत असत. श्रीचा श्वास हलका होऊं लागला. भागूजीचें लक्ष गेलें व त्यांनीं नानासाहेब निमोणकर खालीं बसले होते त्यांना सांगितलें. नानासाहेब पाण्याची झारी घेऊन समर्थांना पाणी पाजूं लागले तों पाणी तोंडांतून बाहेर येऊं लागलें त्या सरशी त्यांनीं "देवा" म्हणून मोठ्यानें किंकाळी मारिली. श्रीनी एकदां डोळे उघडून पाहिलें व हलकेच "आ" म्हणून होकार दिला व प्रयाण केलें. मंगळवारी (ता. १५ ला) दुपारी २॥ चे सुमारास देह ठेविला.

श्रीचे वाड्यांत नेण्याचे उद्गार लक्ष्यांत घेऊन सर्वांनीं बापूसाहेब बुटीचे वाड्यांत श्रीचा देह ठेवण्याचा बेत केला व त्याप्रमाणें देवळाचे गाभाऱ्यांत श्रीना समाधी देण्याकरितां खोदकाम सुरू झालें. सायंकाळीं राहत्याहून फौ-जदार वगैरे आले व हाच निश्चय कायम झाला. जेथें श्रीगोपाळकृष्णाच्या मूर्ति स्थापण्याचा बेत होता तेथेंच श्रींची समाधी झाली. त्या मजबूत गाभाऱ्यांत खोदकाम रात्रभर चालू होतें. दुसरे दिवशीं थोडें विघ्न आलें. सकाळीं मुंबईहून अमीरभाई आले व कोपरगांवचे मामलेदारसाहेबही येऊन पोंचले. फूट झाली. कांहीं मंडळी श्रीना बाहेर शेतांत घेऊन जाण्या-विषयीं आग्रह धरून बसली. मामलेदार साहेबांनीं मतें घेतलीं, तेव्हां दोन

विरुद्ध एकमतें श्री० बापूसाहेबांचे वाड्यांत श्रीना ठेवण्याविषयीं दिसून आलीं. मामलेदार साहेब नगरचे कलेक्टराकडे प्रकरण सोंपवूं लागले व त्याप्रमाणें काकासाहेब दीक्षित नगरला जावयास सिद्ध झाले. तेंव्हां श्रीचे प्रेरणेनें विरुद्ध मंडळीनीं अनुकूल मतें देण्याचें ठरवून सर्वानुमतें बापूसाहेबांचें वाड्यांत समाधी करण्याचा बेत कायम झाला. बुधवारीं सायंकाळीं एकादशीचे दिवशीं श्रीचा देह मिरवत आणून वाड्यांत देऊळाचे गाभारांत ठेवण्यांत आला. त्या जागेला आलेली शोभा आतां प्रत्यक्ष येऊन पाहिल्याशिवाय कळायची नाहीं. देऊळाचे गाभाऱ्याची लांबीरुंदी सुद्धां असावी तेवढीच भरली. वाड्याचें काम हातीं घेतलें तेंव्हां श्रीसमर्थ इतकी पुढें शोभा करतील अशी कल्पनाच नव्हती. कल्पना होणार कशी! श्री नेहमीं म्हणत कीं "आम्ही वाड्यांत जाऊन राहूं" परंतु श्री ह्यात असतांना कोणाला ही पुढची इच्छा व्हावी? वाड्यांत समाधीजवळ मन फार आनंदांत असतें. शिरडींत मनाला पूर्ववतच आनंद होतो. श्री० बापूसाहेबांचे भाग्याची थोरवी कोणी वर्णन करावी. प्रत्यक्ष देव घरीं येऊन बसले; देऊळ बांधलें. त्याचें श्रीनी सार्थक करून दाखविलें. इथें आतां पूजा, अर्चा सर्व प्रकार हिंदू तऱ्हेनें पूर्णपणें चालू आहेत. कसलीही आडकाठी होण्याचा संभव नाहीं. "भेट लोकांची" बाजू देवानीं संभाळली व स्वतःचा देह त्यांचे हवालीं केला. निर्याणाचे पूर्वी ४।५ दिवस सोनीचे आईला बोलावून श्रीनी सांगितलें होतें "आतां मला मशिदीचा कंटाळा आला; चावडीचा कंटाळा आला, आतां मी वाड्यांत जाऊन बसेन तेथें भेट. लोक माझा सांभाळ करतील." जोगांचें ताईला ४।५ वर्षांपूर्वीच हात धरून आणून सांगितलें होतें "ही हगदोडीची जागा माझी आहे. इथें दगडी इमारत होईल तेथें मी बसेन—वगैरे" श्री समर्थांचे संकल्प पूर्वीच ठरलेले होते असें दिसतें. परंतु श्रीनीं कशाचाच कधींही उघड पत्ता लागूं दिला नाहीं. आंतून प्रेरणा करून सर्व काम करून घ्यावयाचें. असो फार आनंद झाला. श्री० बापूसाहेबांवर आतां विशेष जबाबदारी पडली आहे. देऊळाचें काम पुरें करावयाचें आहे. श्रीचे पूजेअर्चेला कायमचें स्वरूप द्यावयाचें आहे. तें आतां समाधी सोडून जातील असें मला वाटत नाहीं.

श्रीनीं निर्माण केल्यावर ठिकठिकाणीं दृष्टांत दिले. सकाळीं लक्ष्मण भटाला दृष्टांतांत येऊन सांगितलें कीं, "तो बापूसाहेब निजला आहे चल ऊठ माझी काकडआरती कर" त्याप्रमाणें लक्ष्मण भटांनीं स्नान करून बुधवारीं सकाळीं मशिदींत जाऊन देहाची पूजा आरती केली. पंढरपूरला मंगळवारीं दासगणूचे दृष्टांतांत जाऊन सांगितलें कीं, "मशीद पडली माझे अंगावर "बख्खळ"फुले घालावयास या." ता २७ आक्टोबरला श्रीचे तेरावे दिवशींचा मोठा उत्सव झाला. ठिकठिकाणाहून भक्तमंडळी आली होती. भंडाऱ्याकरितां लाडवाचें प्रयोजन केलें होतें. भांडाऱ्याची वर्गणी रु० २४०० पर्यंत जमली होती. नानासाहेब चांदोरकर वगैरे सर्व मंडळी एथें जमली होती. पूर्वी श्री० राधाकृष्णाबाई गेल्यापासून भक्तमंडळींनीं वर्गणी करून " कोठी " ही संस्था चालविली होती. श्रीसमर्थांचे पूजेअर्चेचा सर्व खर्च त्यांतूनच चालत असे. ती कोठी अजूनही पूर्ववतच चालू आहे. तूर्त मंडळींनीं एक पंधरा इसमांची कमिटी नेमिली आहे. श्री० बापूसाहेब बुटींनां तिचे अध्यक्ष निवडले आहे. व ते व्यवस्था करतील ती प्रमाण अशी व्यवस्था ता. २४ डिसेंबरपर्यंत ठरली आहे. नाताळांत ता. २४।२५।२६ला सर्व भक्तमंडळी एथें शिरडीला येणार आहेत तेव्हां श्रीचे संस्थाना करितां नियम वगैरे होऊन संस्थेला मूर्त स्वरूप देण्यांत येईल. तेवेळीं आपण एथें जरूर येण्याचें करतील. पत्र सविस्तर घाईघाईनें लिहिलें आहे. लिहिण्यांतील चुका माफ करतील. मी दोन तीन दिवसांनीं नागपूरास जाणार आहे. तेथें भेटीअंती आणखी वर्तमान सांगेन. कळावें लोभ असावा ही विनंती.

आपला नम्र

गणपती नरके

ता० क०:—श्रीचा देह २४ तासाचे वर राहूननही stiff झाला नाहीं. दुसरे दिवशीं तोंडांतून थोडें रक्त येत होतें, हात पाय इकडून तिकडे मोकळे हलत असत. कफनी फाडून काढावी लागली नाहीं. शेवटची कफनी वाडयांतच आपले वरीं आहे.

## ह. भ. प. दासगणु महाराजकृत श्रीसाईबाबावरील एक पद. नं. ६

हे पूर्ण ब्रह्म सुखधाम ज्ञानसागरा । गुरुराया हो मजविषयीं रोष न धरा ॥ ध्रु० ॥ ना तुला कधीं स्पर्शला क्रोध आजवरी । तूं साईक्षमेची मूर्ति साच भूवरीं ॥ मागुति धरुनि अवतार जान्हवी तीरीं । केलीस कृपा त्या परिक्षितीच्यावरी ॥ रंभा ती नाचली पुढें थया थया जरी । नाविकल्प चढला चित्तावरी ॥ हें असे विदित सकळास कशाला जरा । बोलणें तोचि तूं शुकाचार्य नरवरा ॥ १ ॥ तो तूंच पुढें गंगेंत शिंपल्यामधें । अवतार घेतला कबीर म्हणती बुधे ॥ संतार्थ वधू ओपिली वाणिया मती । बसविला विणाया शालुजानकीपति ॥ चरचरा पुत्र कापिला आपुल्या हातीं । पाहता प्रबंधा संत तुझ्या डोलती ॥ ठेवितां देह तो कलह माजला जरा । तर्यि तूंच दाविलीं फुलें करुनि धीवरा ॥ २ ॥ पुनरपि सुवाटे प्रति लावण्या जगा । आलास साई होऊनी फसविना उगा ॥ पाण्यांत लाविले दिवे तेलना मुळीं । टांगिली जुन्या चिंध्यानीं निजाया फळी ॥ पेटतां खळें भक्तांचे आग विझविली । वांझेस करूनिया कृपा संतति दिली ॥ किर्ती अगाध या तव लीळा वानूं गुरुवरा । मौनेच जोडुनी कर पदीं ठेविन शिरा ॥ ३ ॥ मी पापी पतित आगळा दोष सागरू । तुजवीण कुणाचें स्मरण समर्था करूं ॥ गौतमी ओघ तृषितास दूर कां धरी । कां शशी रुसुन बैसेल चकोरावरी ॥ कां काय जमीन ओझ्यास बघुनि भय धरि । वा अग्नि बघुनि गवतास पळतसे दुरी ॥ हें तुम्हीं सकल जाणूनि मनीं गुरुवरा । या दासगणूच्या शिरीं अभय कर धरा ॥ ४ ॥

# हरिभक्तपरायण दास गणूकृत

पद. नं. ७

खेळूं पोरारे चाल पोरा । अपरोक्षज्ञान भोवरा ॥ ध्रु० ॥ झाला वैराग्याची अरी । जाळी भक्तीची सांजिरी ॥ भावें फेकूं हा गरगरा । खेळूं पोरारे ॥ १ ॥ या भवऱ्याचा रंग । आहे अक्षय अभंग । भवीं बुडविल तुज ना जरा । खेळूं पोरारे ॥ २ ॥ याला गुच्याची ना भीती । नादें कळेल आत्मज्योती । रंगण ब्रह्मांडाचें करा । खेळूं पोरारे ॥ ३ ॥ गणु म्हणे ऐसा भोंवरा । पाहिला मी साईकरा । पहा शिर्डीत जाऊन नरा । खेळूं पोरारे॥४॥

# ह. भ. प. दासगणूशिष्य दामूअण्णा विरचित.

पद. नं. ८

त्वरित पदरीं घे साई । ठायीं, करुकायी, मज नाहीं, भो तुजविणरे गुरु माई ॥ धृ० ॥ संकटनाशक नाम तुझें हें । ऐकुनिया बहु आनंदची मज होई ॥ १ ॥ चरणरजातें सेऊनियां ॥ त्वरित पदरीं घेई ॥ हा दास गणूचा छात्र लीन तव पायीं ॥२॥

पद नं. ९

सुजन विबुध नर साई । समयीं निजपदीं द्या ठावा ॥धृ०॥ अनंत मी अपराधी बुडतों सत्पथ मज दावा ॥ १ ॥ चाल ॥ तव साई, चरणाची, मज वरवी द्या सेवा ॥ दास गणूचा दीन छात्र हा निजकर शिरीं ठेवा ॥ २ ॥

## सौ. कृष्णाबाई विरचित.

पद. नं. १०

सांईनाथपदीं लीन सदोदीत ॥ सांईनाथ पदीं लीन ॥ धन्य शिरडी परब्रम्ह वसे त्या ॥ गाऊं कशी मतिहीन सदोदीत ॥ सांईनाथ पदीं लीन ॥ १ ॥ साधु चरित्रें गातां थकले । संत सनकादिक सदोदीव ॥ सा. ना. पदीं लीन ॥ २ ॥ देवि सरस्वती वास जिव्हाग्रीं ॥ कविवरहि मती हीन सदोदीत ॥ सा. ना. पदीं लीन ॥ ३ ॥ कांहीं असो मी मम प्रभूतें ॥ हृदयीं धरूनी गाईन सदोदीत ॥ सांईनाथ पदीं लीन ॥ ४ ॥

## ह. भ. प. दासगणूशिष्य दामूअण्णा विरचित.

पद. नं. ११

मन हें मजसी आकळेना । पदरीं दीना घे सांई ॥ भवभय डोहीं किमपी दयाळा बुडों नेदी भो मज लागीं ॥ पापि अती मी नको दोष वंघूं मम कांहीं ॥ पदरीं ॥ १ ॥ दीनानाथ तव ब्रीद गाजलें म्हणुनी धावलों तव पायीं ॥ धरिना अही चा मनीं ब्रीद जतन करी कांहीं ॥ पदरीं ॥ २ ॥ झडप घालिती षड्रिपु मजवरि । जेवि भुजंग दर्दुर हृदयीं ॥ मज ना दकळीं किती माधूं तुजसी गुरु माई ॥ पदरीं ॥ ३ ॥ दीन दयाळा खचित जगतीं पतितोध्दारा अवतरसी ॥ तारि सतत गणु छात्र लीन तव पायीं ॥ पदरीं ॥ ४ ॥

# अध्याय १३ वा.

श्रीगणेशायनमः । श्रीसरस्वत्यैनमः । श्रीगुरुभ्योनमः ।
श्रीकुलदेवतायैनमः । श्रीसीतारामचंद्राभ्यांनमः ।
श्रीसद्‌गुरूसाईनाथायनमः ॥

आकारें सूत्रमय अति लहान । अर्थगांभीर्यें अति गहन ॥
व्यापकत्वें बहु विस्तीर्ण । संकीर्ण तरी तितुकेंच ॥ १ ॥
ऐसे ते बाबांचे बोल । अर्थें तत्वें अति सखोल ॥
कल्पांतींही नव्हत फोल । समतोल आणी अणमोल ॥ २ ॥
पूर्वापरानु संधान रहावें । यथा प्राप्तानुवर्ती व्हावें ॥
नित्य तृप्त सदा असावें । नसावें सचिंत कदापि ॥ ३ ॥
अरे जरी मी झालों फकीर । घर ना दार बेफिकीर ॥
बसलों एका ठायीं स्थीर । सारी फिरफिर त्यागुनी ॥ ४ ॥
तरी ती माया अनिवार । मलाही गांजी वरचेवर ॥
मी विसरें परी तिजला न विसर । मजही निरंतर कवटाळी ॥५॥
आदि मायाच ते हरीची । त्रेधा उडविते ब्रम्हादिकांची ॥
तेथ मज दुबळ्या फकीराची । वार्ता कैंची तिजपुढें ॥ ६ ॥
हरीच होईल जेव्हां प्रसन्न । तेव्हांच होईल ते विच्छिन्न ॥
विना अविच्छिन्न हरि भजन । माया निरसन नोहेपा ॥ ७ ॥

ऐसीही मायेची महती । भक्तांलागी बाबा कथिती ॥
सर्वेचि व्हावया तन्निवृत्ती । भजन स्थिती वानीती ॥ ८ ॥
संत माझी सचेतन मूर्ती । कृष्णस्वयें म्हणे भागवतीं ॥
कोणा न ठावी ही स्पष्टोक्ती । उद्धवाप्रती हरीची ॥ ९ ॥
म्हणोनि भक्तकल्याणार्थ । दयाघन साईसमर्थ ॥
वदते झाले जें सत्यसार्थ । परिसा अति विनीत होउनी ॥ १० ॥
पाप जयाचें विलया गेलें ।ऐसे जे पुण्यात्मे वहिले ॥
तेच माझे भजनी लागले । खूण लाधले ते माझी ॥ ११ ॥
साई साई नित्य म्हणाल । सात समुद्र करीन न्याल ॥
या बोला विश्वास ठेवाल । पावाल कल्याण निश्चयें ॥ १२ ॥
नलगे मज पूजा संभार । षोडश वा अष्टोपचार ॥
जेथें भाव अपरंपार । मजला थार ते ठायीं ॥ १३ ॥
ऐसें बाबा वेळोवेळा । बोलून गेले भक्तजिव्हाळा ॥
आतां आठवूनी त्या प्रेमळ बोला । करूं विरंगुळा मनासी ॥१४॥
ऐसा हा दयाळू साईसखा । शरणागताचा पाठिराखा ॥
भक्तकैवार घेऊनि निका । नवल विलोका केले तें ॥ १५ ॥
दवडूनि चित्ताची अनेकाग्रता । करोनि तयाची एकाग्रता ॥
परिसावी ही नूतन कथा साग्रता । कृतकार्यता होईल ॥१६॥
साई मुखींची अमृतवृष्टि । तीच जेथें पुष्टी तुष्टी ॥
कोण कंटाळे शिरडीचे कष्टीं । निज हित दृष्टि ठेविल्या ॥ १७ ॥
गताध्यायीं अनुसंधान । दिधलें एका अग्निहोत्र्या लागून ॥
ब्रम्हीभूत निजगुरु दर्शन । आनंदसपन्न त्या केलें ॥ १८ ॥

आतां हा अध्याय त्याहून गोड। भक्त एक क्षयीं रोड ॥
दिधली तया आरोग्याची जोड। मोडूनि खोड स्वप्नांत ॥ १९ ॥
तरीं ऐका भाविकजन। होऊनियां दत्तावधान ॥
साईनाथ चरित्र गहन। कल्मषदहनकारक जें ॥ २० ॥
पुण्य पावन हें चरित्र। जल जैसें गंगेचें पवित्र ॥
धन्य श्रवण कर्त्यांचे श्रोत्र। इह परत्र साधिक तें ॥ २१ ॥
पाहूं अमृताची उपमा देऊन। परी अमृत काय गोड याहून ॥
अमृत करील प्राण रक्षण। जन्म निवारण चरित्र हें ॥ २२ ॥
जीव म्हणती सत्ताधीश। करील जें जें येईल इच्छेस ॥
ऐसें जयाचे वाटे मनास। कथानकास या परिसावें ॥ २३ ॥
जीव जरी खरा स्वतंत्र। सुखालागी कष्टतां अहोरात्र ॥
पदरीं पडतें दुःख मात्र। हें तों चरित्र सत्तेचें ॥ २४ ॥
दुःखें टाळावयालागीं असतां सावधान जागोजागीं ॥
तीं त्या धुंडीत लागवेगी ॥ त्याचीच मागी घेतात ॥ २५ ॥
वारूं जातां गळां पडती। झाडून टाकितां अधिक लिपडती ॥
वाउगी जीवाची धडपडती। अहो राती तो शीण ॥ २६ ॥
जीव जरी खरा स्ववश। तरी तो असता पूर्ण सुखवश ॥
दुःखाचा एक लवलेश। रेसभरही ना तळशा ॥ २७ ॥
पापा न आचरिता कधीं। पुण्याचीच करितां समृद्धि ॥
सुखाचीच संपादिता वृद्धि। स्वतंत्र बुद्धि म्हणवोनी ॥ २८ ॥
परी जीव नाहीं स्वतंत्र। पाठीं लागलें कर्म तंत्र ॥
तयाचा खेळचि विचित्र। कळसूत्र हातीं कर्माचे ॥ २९ ॥

पुण्याकडे लक्ष जाय । पापाकडे ओढिती पाय ॥
सत्कर्माचा शोधितां ठाय । कुकर्मीं काय आतुडे ॥३० ॥

पुणें जिल्ह्यांतील जुन्नरामाजी । नारायण गांवचा पाटील भिमाजी
तयाची कथा आता परिसाजी । रसराजीच अमृताची ॥ ॥ ३१॥

भीमाजी घरचा सुखसंपन्न । आल्यागेल्या घाली अन्न
कधीं न ज्याचें वदन खिन्न । प्रसन्न वदन सर्वदा ॥ ३२ ॥

अदृष्टांचे विलक्षण संजोग । न कळतां होती लाभ वियोग ॥
चालून येती कर्मभोग । नसते रोग उद्भवती ॥ ३३ ॥

इसवी सन एकूणीससें नव ॥ भीमाजीस पीडी दुर्दैव ॥
होय कफक्षय रोगोद्भव । प्रादुर्भाव ज्वराचा ॥ ३४ ॥

येऊं लागला असह्य खोकला । ज्वरही फार वाढूं लागला ॥
दिवसेंदिवस बळावत गेला । निराश झाला भीमाजी ॥ ३५ ॥

तोंडास फेस सर्वदां येणं । मचूळ आणि रक्ताचं गुळणे ॥
पोटांत अक्षयी कळमळणें । जीव तगमगणें राहीना ॥ ३६ ॥

शेजे खिळिला दुखणाईत । गळालीं गात्रें चालला नाळत ॥
उपायांची झाली शिकस्त । झाला तो त्रस्त अत्यंत ॥ ३७ ॥

अन्नपान कांहीं न रुचे । पेज पथ्य कांहीं न पचे ॥
तेणें अस्वस्थ कांहीं न सुचे । हाल जीवाचे असह्य ॥ ३८ ॥

देवदेवस्की झाली सारी । हात टेकिले वैद्य डॉक्टरीं ॥
पाणी सोडिलें जीविताशेवरी । पडला विचारीं भीमाजी ॥ ३९ ॥

पाटील झाले उद्विग्न चित्तीं । दिसती थोडे दिसांचे सोबती ॥
उत्तरोत्तर फारचि थकती । दिवस गती लागले ॥ ४० ॥

आराधिली कुलदेवता ! तीही देईना आरोग्यता ॥
जोशी पंचाक्षरी समस्तां । थकले पुसपुसतां पाटील ॥ ४१ ॥
कोणी म्हणती अंगरोग । काय तरी हा दैवयोग ॥
वाटे ओढवला पुरा भोग । निरुपयोग मनुष्य यत्ना ॥ ४२ ॥
डॉक्टर झाले हकीम झाले । उपचार करितां टेकीस आले ॥
कोणाचें कांहींच न चले । प्रयत्न हरले सकळांचे ॥ ४३ ॥
पाटील अत्यंत कदरले । म्हणती देवा म्यां काय केलें ॥
कांहींच का उपयोगा न आलें । पाप असलें कैचें हें ॥ ४४ ॥
देव तरी कैसा विलक्षण । सौख्य भोगल्या एकही क्षण ॥
अपुलें होऊं नेदी स्मरण । नवल विंदान तयाचें ॥ ४५ ॥
मग तयाच्याच जें येई मना । संकट परंपरा धाडितो नाना ॥
करवून घेई आपुल्या स्मरणा । 'नारायणा धांव' म्हणवी ॥ ४६
असो कळवळयाचा धांवा ऐकिला । देव तात्काळ गहिंवरला ॥
बुद्धी उपजली भीमाजीला । पत्र घालावें नानाला[1] ॥ ४७ ॥
करितील कांहीं तरी नाना । इतर कवणा जें करवेना ॥
ऐसा पूर्ण विश्वास मना ! पाटलांना वाटला ॥ ४८ ॥
तोच त्याचा शुभशकुन । तेंच रोगाचें निरसन ॥
पुढें सविस्तर पत्र लिहून । नानांस त्यांनीं पाठविलें ॥ ४९ ॥
नानासाहेबांचें स्मरण ॥ तेंच साईनाथांचें स्फुरण ॥
उद्भवलें रोगनिवारण कारण । अतर्क्य विंदान संतांचें ॥ ५० ॥
होका कालचक्राची रचना । तेथही दिसते ईश्वरी योजना ॥
यास्तव कोणी अन्यथा कल्पना । करूनि वल्गना न करावी॥५१॥

---

१ नारायण गोविंद चांदोरकर उर्फ नानासाहेब.

वरी वाईट क्रिया सारी । ईश्वर तेथींचा सूत्रधारी ॥
तोच तारी तोच मारी । कार्यकारी तो एक ॥ ५२ ॥

पाटील लिहिती चांदोरकरांस । औषधें खातां आला त्रास ॥
कदरलों मी या जीवितास । जग उदास वाटतें ॥ ५३ ॥

डॉक्टरांनीं आशा सोडिली । व्याधी दुःसाध्य ऐसी ठरविली ॥
हकीम वैद्यांची बुद्धि थकली । उमेद खचली माझी ही ॥ ५४ ॥

तरी आतां एक विनंति । आहे अपुले चरणांप्रती ॥
व्हावी मज अपुली भेट निश्चितीं । ही एक चित्तीं असोसी ॥ ५५ ॥

चांदोरकरांनीं पत्र वाचिलें । त्यांचेंही मन खिन्न झालें ॥
भीमाजी पाटील बहु भले । नाना द्रवले अंतरीं ॥ ५६ ॥

उत्तरीं कळविती एकचि उपाय । साईबाबांचे धरावे पाय ॥
हाचि केवळ तरणोपाय । बाप माय तो एक ॥ ५७ ॥

तीच कनवाळू सर्वांची आई । हांकेसरसी धांवत येई ॥
कळवळून कडियें घेई । जाणे सोई लेंकराची ॥ ५८ ॥

क्षयरोगाची कथा काय । महारोग दर्शनें जाय ॥
शंका न धरी तिळमाय । घट्ट पाय धरी जा ॥ ५९ ॥

जो जें मागे त्यातें देई । हें ब्रीद जयानें बांधिलें पायीं ॥
म्हणोनि म्हणतों करी गा घाई । दर्शन घेई साईचें ॥ ६० ॥

भयामाजीं मोठें भय । मरणापरिस दुजें काय ॥
घट्टधरी जा साईचे पाय । करील निर्भय तो एक ॥ ६१ ॥

दुःसह्य पाटलाची व्यथा । पातली प्राणांतीक अवस्था ॥
कधीं भेटेन साईनाथा । कधीं कार्यार्था साधेन ॥ ६२ ॥

ऐसा पाटील झाला बावरा । म्हणे सरसामान आवरा ॥
उदयीक सत्वर तयारी करा । वाटधरा शिरडीची ॥ ६३ ॥
येणेंप्रमाणें दृढनिश्चयेसी । निरोप पुसून सकळिकांसी ॥
महाराजांचें दर्शनासी । निघाले शिरडीसीं पाटील ॥ ६४ ॥
घेतले आप्तजन बरोबरी । भीमाजी निघाले झडकरी ॥
उत्कंठा फारचि अंतरीं । शिरडीसत्वरी कैं देखें ॥ ६५ ॥
मशींदीच्या चौंकाशेजारी । गाडी आली पुढले व्दारीं ॥
चौघांहीं वाहूनिया करीं । भीमाजी वरी आणिलें ॥ ६६ ॥
नानासाहेब समवेत होते । माधवरावही आले तेथें ॥
ज्या माधवरावाचिया हातें । सुगम पद तें सर्वत्रां ॥ ६७ ॥
पाटील पाहोनी बाबा वदती ।शामा हे चोर आणुन किती ॥
घालिशी माझे अंगावरती । काय हे कृती बरीका ॥ ६८ ॥
साईपदीं ठेविला माथा । भीमाजी म्हणे साईनाथा ॥
कृपा करी मज अनाथा । दीनानाथा सांभाळीं ॥ ६९ ॥
देखूनिया पाटलाची व्यथा । दया उपजली साईनाथा ॥
ते सरसी शमली दुःखावस्था । पाटील चित्ता विश्वासला ॥ ७०॥
पाहूनि भीमाजी अस्वस्थ । कृपासागर साई समर्थ ॥
हेलावला अपरिमित । बोले सस्मितमुख तेव्हां ॥ ७२
बैस आतां सोडी खंत । खंत न करिती विचारवंत ॥
झाला तुझिया भोक्तृत्वा अंत । पाय शिरडींत टाकितां ॥ ७२ ॥
आकंठ संकटार्णवीं बुडाला । होका महद्दुःख गर्तेत गढला ॥
जो या मशीदमाईची पायरी चढला । सुखा आरूढला तो जाणा ॥७३

फकीर येथींचा मोठा दयाळू । करील व्यथेचें निर्मूळू ॥
प्रेमें करील प्रतिपाळू । तो कनवाळू सकळांचा ॥ ७४ ॥
यालागी तूं स्वस्थ पाहीं । भीमाबाईच्या सदनीं राही ॥
आराम तो एका दोदिसांही । जा कीं होईल तुजप्रती ॥ ७५ ॥
जैसा एकादा आयुष्यहीन । पावे सुदैवें अमृत सिंचन ॥
लाधे तात्काळ पुनरुजीवन । तैसें समाधान पाटिला ॥ ७६ ॥
ऐकूनि साई मुखींचें वचन । मरणोन्मुखा अमृतपान ॥
किंवा तृषार्ता लाधावें जीवन । तैसें समाधान पाटिला ॥ ७७ ॥
प्रति पांच मिनिटांस । रक्ताच्या गुळण्या येत मुखास ॥
बाबा सन्मुख एक तास । बैसतां निरास पावल्या ॥ ७८ ॥
केले न व्यथेचें परीक्षण । पुसिलें न तदुद्भव कारण ॥
केवळ कृपा निरीक्षण । रोगोन्मूलन तात्काल ॥ ७९ ॥
कृपा निरीक्षण होतां पुरें । वाळल्या काष्ठा येती कोंभरे ॥
वसंतावीण फुलती तुरे । तें फळीं डवरें रमणीय ॥ ८० ॥
रोग काय आरोग्य काय । पुण्यापापाचा होतां क्षय ॥
ज्याचें त्यानें भोगिल्याशिवाय । अन्य उपाय चालेना ॥ ८१ ॥
केवळ भोगेंच तयांसी क्षय । जन्मजन्मांतरीं हाचि निश्चय ॥
भोगिल्यावीण अन्य उपाय । निवृत्तिदायक नाहींच ॥ ८२ ॥
तथापि भाग्यें संत दर्शन । हें एक व्याधीचें उपशमन ॥
व्याधीग्रस्त मग व्याधीचें सहन । दुःखेंवीण सहज करी ॥ ८३ ॥
व्याधी दावी भोग दारुण । संत दावी दृष्टिसकरुण ॥
तणें भोक्तृत्व दुःखावांचण । संत निवारण करिनात ॥ ८४ ॥

केवळ बाबांचा शब्द प्रमाण । तेंच औषध रामबाण ॥
एकदां कृष्ण श्वान भक्षितां दध्योदन।जाहलें निवारण हीमज्वराचें ८५
कथेंत वाटतील या आड कथा। परी या संकलित श्रवण करितां ॥
दिसून येईल समर्पकता । स्मरण दाताही साईच ॥ ८६ ॥
"माझी कथा मीच करीन" । साईच गेले आहेत बोलून ॥
त्यांनींच या कथांची आठवण । दिधली मजलागून येसमयीं ॥८७॥
बाळा गणपत नामें एक । जातीचा शिंपी मोठा भाविक ॥
येऊनि मशीदींत बाबा सन्मुख । अति दीनमुख विनवीत ॥ ८८॥
काय ऐसे म्यां केलें पाप । कां हा सोडीना मज हिंवताप ॥
बाबा झाले उपाय अमूप । हलेना तत्राप अंगींचा ॥ ८९ ॥
तरी मी आतां करूं काय । जाहली सर्व औषधें कपाय ॥
आपण तरी सांगा उपाय । कैसेनी जाय हा ताप ॥९० ॥
तंव दया उपजली अंतरीं । बाबा वदत प्रत्यूत्तरीं ॥
उपाय त्या हिमज्वरावरी । ती नवलपरी परिसावी ॥ ९१ ॥
दही भाताचे कांहीं कवळ । लक्ष्मी आईच्या देउळाजवळ ॥
"काळ्या कुत्र्यास खाउं घाल"। बरा होशील तात्काळ ॥ ९२ ॥
बाळा भीत भीतचि गेला । घरीं जाउन पाहूं लागला ॥
झांकून ठेविला भात आढळला । दही ही लाधला शेजारीं ॥ ९३ ॥
बाळा मनीं विचार करी । दहीं भात मिळाला तरी ॥
काळाच कुत्रा वेळेवरी । देउळाशेजारीं असेल का ॥ ९४ ॥
परी ही बाळाची उगीच चिंता । निर्दिष्ट स्थळीं जाऊन पोहचतां
कृष्ण श्वान एक पुच्छ हालवितां । समोर येतां देखिलें ॥ ९५ ॥

पाहून ऐसा हा योग जुळला । बाळास मोठा आनंद झाला ॥
दहीं भात खाऊं धावला । वृत्तांत कळविला बाबांस ॥ ९६ ॥
सारांश हा जो प्रकार घडला । कोणी कांहींही म्हणो तयाला ॥
तेव्हांपासून हिमज्वर गेला । आराम जाहला बाळास ॥ ९७ ॥
ऐसेंच बापूसाहेब बुट्टीं । थंडी जाहली होती पोटीं ॥
जुलाब होत पाऊठोपाउठीं । उलटी वर उलटी एक सरा ॥ ९८ ॥
सर्वौषधानीं कपाट भरलें । परी एकही न लागू पडलें ॥
बापूसाहेब मनीं घाबरले । बहुत पडले विचारीं ॥ ९९ ॥
जुलाब उलटया होऊन होऊन । बापूसाहेब जाहले क्षीण ॥
नित्यनेम बाबांचें दर्शन । घ्यावया त्राण नुरलें त्या ॥ १०० ॥
गोष्ट गेली बाबांचें कानीं । आणवून बसविलें सन्मुख त्यांनीं ॥
म्हणाले खबरदार आतांपासुनी । मल विसर्जनीं जातां नये ॥१०१
वांतीही राहिली पाहिजे ठिकाणीं । तयां सन्मुख हालवून तर्जनी॥
पुनश्च पूर्ववत तया अनुलक्षुनी । म्हटलें बाबांनीं तसेंच ॥ १०२ ॥
तात्पर्य काय त्या शब्दांचा दरारा। दोनी व्याधींनीं घेतला भेदरा॥
केला पहा तात्काळ पोबारा। जाहला आराम बुट्टींस ॥ १०३ ॥
एकदां गांवीं वाऱ्याचा उद्भव । असतां जाहला तयांस उपद्रव॥
वांती रेच यांचा समुद्भव । कळमळला जीव तृषाकुल ॥१०४॥
पाशींच होते डाक्टर पिळ्ळे । तयांनीं उपाय सर्व वेंचले ॥
शेवटीं जेव्हां कांहींच न चले । मग ते गेले बाबाकडे ॥ १०५ ॥
होतें जैसें जैसें घडलें । साई चरणीं सर्व निवेदिलें ॥
काफी घ्यावी कीं पाणी चांगले । विचारिती पिळ्ळे बाबांस॥१०६॥
तंव बाबा वदती तयांला । "खा, दूध, बदाम, घाला ॥
अक्रोड पिस्त्यांसह तयांला । प्यावयाला द्या तरण" ॥ १०७ ॥

तेणें तयाची राहील तहान । होईल सत्वर व्याधी हरण ॥
सारांश ऐसें हें पाजितां तरण । उपद्रव निरसन जाहलें ॥१०८॥

'खा अक्रोड पिस्तं बदाम' । येणें पटकीस पडावा आराम ॥
शब्दचि बाबांचा विश्वास धाम । शंकेचें काम ना येथें ॥ १०९ ॥

आळंदीचे एक स्वामी । साई समर्थ दर्शनकामी ॥
आले एकदां शिरडीग्रामीं । पातले आश्रमीं साईंच्या ॥ ११० ॥

होतां तयांस कर्ण रोग । तेणें अस्वास्थ्य निद्राभंग ॥
करवितांही शस्त्र प्रयोग । कांहीं न उपयोग तिळमात्र ॥ १११ ॥

ठणका लागे अनावर । चाले न कांहीं प्रतीकार ॥
निघावयाचा केला विचार । गेले आशिर्वाद मागावया ॥ ११२ ॥

अभिवंदूनि साई पादां । पावूनिया उदी प्रसादा ॥
स्वामी मागत आशिर्वादा । कृपा सर्वदा असावी ॥ ११३ ॥

माधवराव देशपांड्यांनीं । कानाप्रीत्यर्थ केली विनवणी ॥
"अल्ला अच्छा करेगा" म्हणुनी । महाराजांनीं आश्वासिलें ॥११४॥

ऐसा आशिर्वाद लाधुनी । स्वामी परतले पुण्यपट्टणीं ॥
पत्र आलें आठा दिसांनीं । ठणका तत्क्षणींच राहिला ॥ ११५ ॥

सूज मात्र कायम होती । शस्त्र प्रयोग करावा म्हणती ॥
पुन्हां तो प्रयोग करावा ये अर्थीं । आलों मुंबईप्रती मागुता ॥११६॥

गेलों पुढील डाक्टराकडे । नकळे बाबांना पडलें सांकडें ॥
डाक्टर पाही जों कानाकडे । सूज कोणीकडे लक्षेना ॥ ११७ ॥

शस्त्रप्रयोग आवश्यकता । डाक्टर म्हणे नलगे आतां ॥
स्वामीची हरली दुर्धर चिंता । विस्मय समस्तां वाटला ॥ ११८ ॥

ऐशीच आणीक एक कथा । ओघास आली जी प्रसंगवशता ॥
ती सांगून श्रोतयां आतां । अध्याय आटोपता घेऊं हा ॥ ११९ ॥
सभामंडपाची फरसी । बांधूं आरंभिली जे दिवसीं ॥
त्या आधीं आठ दिनं महाजनीसीं । जाहली मोडसी दुर्धर ॥१२०॥
जुलाब होऊं लागले फार । मनींचे मनीं बाबांवर भार ॥
करीनात औषध वा उपचार । अत्यंत बेजार जाहले ॥ १२१ ॥
साई पूर्ण अंतर्ज्ञानी । जाणत होते महाजनी ॥
म्हणवूनि हें अस्वास्थ्य तयां लागुनी । केलें न त्यांनीं निवेदन॥१२२॥
येईल जेव्हां तयांचे मनीं । करितील निवारण आपण होऊनी ॥
ऐसें पूर्ण विश्वासुनीं । व्याधी सोसूनि राहिले ॥ १२३ ॥
भोग भोगूं आपण सकळ । परी न पूजेसि पडावा खळ ॥
हीच एक इच्छा प्रबळ । सर्वकाळ काकांस ॥ १२४ ॥
जुलाब कितीदां आणि केव्हां । प्रमाणातीत झाले जेव्हां ॥
चुकूं नये आरती सेवा । ह्मणून तेव्हां काय करिती ॥ १२५ ॥
तांब्या एक पाण्याभरला । अंधारांतही लागेल हाताला ॥
ऐसे जागीं मशीदीला । एकां बाजूला ठेवीत ॥ १२६ ॥
स्वयें बैसत बाबापाशीं । चरण संवाहन करावयासीं ॥
हाजर नित्य आरतीसी । नित्य नेमेसीं चालवीत ॥ १२७ ॥
आली जरी पोटांत कळ । तांब्या होताच हाताजवळ ॥
पाहूनि जवळ एकांत स्थळ । होऊनि निर्मळ परतत ॥ १२८ ॥
असो फरसी करावयासी । आज्ञा मागतां बाबापासीं ॥
दिधली पहा ती तात्याबांसीं । वदती तयासीं काय पहा ॥१२९॥

जातों आम्ही लेंडीवर । लेंडीवरून परतल्यावर ॥
करा आरंभ बरोबर । या फरशीचे कार्यास ॥ १३० ॥

पुढें बाबा परत आले । आसनावरी जाऊन बैसले ॥
पादसंवाहन सुरूं केलें । येऊन वेळेवर काकांनीं ॥ १३१ ॥

कोपरगांवाहून तांगे धडकले । मुंबईकडील भक्त पातले ॥
पूजासंभार सहित चढले । येऊनि अभिवंदिलें बाबांस ॥ १३२ ॥

इतर मंडळी समवेत । अंधेरीचे पाटीलही येत ॥
घेऊन पुजा पुष्पाक्षत । वाट पाहत बैसले ॥ १३३ ॥

इतक्यांत खाली पटांगणांत । रथ जेथें ठेवीत असत ॥
कुदळ मारून बरोबर तेथ । फरशीची सुरवात जाहली ॥ १३४ ॥

ऐकिला तो अवाज मात्र । बाबांनीं ओरड केली विचित्र ॥
धरिला तात्काळ नृसिंहावतार । नेत्रटवकार भयंकर ॥ १३५ ॥

कोण मारतो कुदळीचा फटका । करितों तयाला कंबरेंत लटका ॥
बोलत उठलेच घेऊन सटका । भीतीचा धडका समस्तां ॥ १३६ ॥

कुदळी टाकून मजूर पळाला । जो तो उठून धांवत सुटला ॥
काकांचाही जीव दचकला । तों हातचि धरिला बाबांनीं ॥ १३७ ॥

म्हणती जातोस कुठें बस खाली । इतक्यांत तात्या लक्ष्मी आली ॥
तयांसही शिव्यांची लाखोली । मनसोक्त वाहिली बाबांनीं ॥ १३८ ॥

अंगणाबाहेर जी मंडळी । तयासही शिवीगाळी केली ॥
इतक्यांत भाजल्या भुईमुगांची थैली । ओढूनि घेतली पडलेली ॥ १३९ ॥

बाबां असतां त्वेषावेशीं । पळाले जे भीतीनें चौपाशीं ॥
एकाद्याची ती मशीदीशीं । पिशवी असेल कीं पडलेली ॥ १४० ॥

दाणें असतील पक्का शेर । मूठमूठ काढून बाहेर ॥
चोळूनिया हातावर । मारूनि फुंकर साफ करीत ॥ १४१ ॥

मग ते स्वच्छ झालेले दाणे । महाजनीकडून खावविणें ॥
एकीकडेस शिव्याही देणें । एकीकडे चोळणें सुरूच ॥ १४२ ॥

खाऊन घे म्हणत म्हणत । स्वच्छ दाणें हातावर ठेवीत ॥
कांहीं आपणही तोंडांत टाकित । पिशवी संपवीत येरी ती ॥१४३॥

दाणें संपतां म्हणती आण । पाणी लागली मजला तहान ॥
काका आणिती झारी भरून । स्वयें तें पिऊन पी म्हणती ॥१४४॥

काका पितां तयांस वदती । झाली जा तुझी बंद बृहती ॥
मेले कुठें ते बामण म्हणती । जा तयांप्रती घेऊन ये ॥ १४५ ॥

असो पुढे मंडळी आली । मशीद पूर्वीप्रमाणें भरली ॥
फरशीस पुनः सुरवात झाली । मोडशी थांबली काकांची ॥१४६ ॥

जुलाबावर हें काय औंषध । परी औंषध तो संताचा * शब्द ॥
देतील तो जो मानी प्रसाद । तया न अगद आणीक ॥ १४७ ॥

* शिर्डीचे रा. माधवराव देशपांडे यांनां एकदां मूळव्याध झाली. त्यांनीं महाराजानां सांगितलें. महाराज म्हणाले 'आपण दुपारीं औंषध करूं.' त्याप्रमाणें दुपारीं महाराजांनीं सोनामुखीचा काढा केला व त्यांतला थोडा माधवरावांना दिला. त्याबरोबर मूळव्याध एकदम बंद झाली. पुढे दोन वर्षांनीं त्यांनां पुन्हां मूळव्याध झाली. महाराजांनीं पूर्वी काढा दिला होता. म्हणून माधवरावांनीं आपल्याच विचारानें काढा घरीं तयार करून तो घेतला. त्यापासून बरें न वाटतां मूळव्याध जास्त भडकली. पुढें कांहीं दिवसांनी महाराजांचे कृपेनें बंद झाली. सारांश गुण औंषधांत नसून महाराजांच्या हातांत व आशिर्वादांत असे.

हरदा शहरचे एक गृहस्थ । पोटशूळ व्याधिग्रस्त ॥
चवदा वर्षें जाहले त्रस्त । उपाय समस्त जाहले ॥ १४८ ॥
नाम तयांचें दत्तोपंत । कर्णोपकर्णीं ऐकिली मात ॥
शिरडींत साई महा संत । दर्शनें हरतात अपाय ॥ १४९ ॥
परिसूनिया ऐसी कीर्ती । गमन केलें शिरडीप्रती ॥
चरण साईंचे माथा वंदिती । करूणा भाकिती तयांतें ॥ १५० ॥
बाबा चौदा वर्षें भरलीं । पोटशूळें पिच्छा पुरविली ॥
पुरे आतां परमावधी झाली । शक्ति न उरली भोगावया ॥ १५१ ॥
केला न कोणाचा घातपात । अवमानिली न मायतात ॥
नाठवे पूर्वजन्मींची मात । जेणें हे होतात कष्ट मज ॥ १५२ ॥
केवळ संतप्रेमावलोकन । संतप्रसाद आशिर्वचन ॥
येणेंच होय व्याधी निरसन । नलगे आन कांहींही ॥ १५३ ॥
तैसाच अनुभव दत्तोपंतां । बाबांचा कर पडतां माथां ॥
विभूती आशिर्वाद लाधतां । आराम चित्ता वाटला ॥ १५४ ॥
मग महाराजांनी तयांस । ठेवूनि घेतलें कांहीं दिवस ॥
हळूहळू पोटशूळाचा* त्रास । गेला विलयास समूळ ॥ १५५ ॥

---

* काका महाजनींचे वडील बंधु रा. गंगाधरपंत यांना पोटशूळाचा आजार पुष्कळ वर्षें होता. दरवर्षी त्यापासून त्यांना अतिशय त्रास होत असे. त्यांनीं महाराजांची कीर्ती ऐकल्यावरून ते तिकडे गेले व महाराजांजवळ गाऱ्हाणें केलें. महाराजांनीं पोटाला हात लावल्या व येथे दुखते कां म्हणून विचारलें. गंगाधरपंतांनीं होय असें उत्तर दिलें. महाराज म्हणाले ' अल्ला बरें करील. ' तेंव्हांपासून गंगाधरपंताचा पोटशूळ जो गेला तो पुन्हां उमटला नाहीं.

असो ऐसे हे महानुभाव । काय वानूं मी तयांचा प्रभाव ॥
परोपकृती हा नित्य स्वभाव । जयां सद्भाव चराचरीं ॥ १५६ ॥

गाऊं जातां हें शब्द स्तोत्र । एकाहून एक विचित्र ॥
आतां पुर्वानुसंधान सूत्र । भीमाजी चरित्र चालवूं ॥ १५७ ॥

असो बाबा ऊदी मागवती । भीमाजीस थोडी देती ॥
थोडी तयाचे कपाळा फांसिती । शिरीं ठेविती निज हस्त ॥ १५८ ॥

जावया विन्हाडीं आज्ञा झाली । पाटील निघाले पायचाली ॥
गाडीपर्यंत अपुले पाउलीं । गेले हुषारी वाटली ॥ १५९ ॥

तेथून निर्दिष्ट जागींच जात । स्थान जरी होतें संकोचित ॥
परी तें बाबांही केलें सूचित । हेंच कीं महत्व तयांचें ॥ १६० ॥

चोपण्यांनीं नवथर चोपिली । म्हणून जमीन होती ओली ॥
तरी बाबांची आज्ञा मानिली । सोई लाविली तेथेंच ॥ १६१ ॥

गावांत मिळती जागा सुखी । भीमाजीच्या बहुत ओळखी ॥
परी बाबांचें स्थान जें आलें मुखीं । सोडून आणिकां नवजाणें ॥ १६२ ॥

तेथेंच दोन पाथरिले गोण । वरी पसरुनियां अंथरुण ॥
करुनियां स्वस्थ मन । केलें शयन पाटलांनीं ॥ १६३ ॥

---

एकदां नानासाहेब चांदोरकर यांस पोटशूळाचा विकार झाला. तो इतका कीं, रात्रंदिवस ते एकसारखे तळमळत असत. त्यांना डाक्टरांनीं पिचकाऱ्या दिल्या पण कांहीं उपयोग झाला नाहीं. शेवटीं महाराजांकडे गेले व महाराजांनीं बर्फी तुपांत घालून खाण्यास सांगितली. ह्या उपायानें त्यांचा पोटशूळ अजिबात बंद झाला.

तेच रात्रीं ऐसें वर्तलें । भीमाजीस स्वप्न पडलें ॥
बाळपणीचे पंतोजी आले । मारूं लागले तयातें ॥ १६४ ॥

हातीं एक वेताची काठी । मारमारोनि फोडिली पाठी ॥
सवाई मुखोद्गत व्हावयासाठीं । केले बहु कष्टी शिष्यातें ॥ १६५ ॥

सवाई तरी होती कैंची । जिज्ञासा प्रबळ श्रोतयाची ॥
म्हणून अक्षरें अक्षर तीची । देतो समूळचि परिसिली जी ॥१६६॥

## सवाई.

जीस गमे पद अन्य गृहीं जरि ठेवियलें जणु सर्पशिरीं ॥
वाक्य जिचें अति दुर्लभ ज्यापरि दुर्मिळ तें धन लोभि करीं ॥
कांतसमागम तेंच गमे सुखपर्व नसे जरि वित्त घरीं ॥
शांत मनें निज कांत मतें करि कृत्य सती जनिं तीच खरी ॥

परी हें शासन कशासाठीं । हेतो कांहींच कळेना गोठी ॥
पंतोजी टाकीना वेताटी । पेटला हट्टीं अनिवार ॥ १६७ ॥

लगेच पडलें दुसरें स्वप्न । तें तों याहून विलक्षण ॥
कोणी एक गृहस्थ येऊन । छाती दडपून बैसला ॥ १६८ ॥

हातीं घेतला वरवंटा । वक्षस्थळाचा केला पाटा ॥
प्राण कासावीस आले कंठा । जणु वैकुंठा निघाले ॥ १६९ ॥

स्वप्न सरलें लागला डोळा । तेणें मनास थोडा विरंगुळा ॥
उदयाचला सूर्य आला । जागा झाला पाटील ॥ १७० ॥

हुशारी वाटे अपूर्व मना । समूळ मावळे रोगाची कल्पना ॥
पाटा वरवंटा छडीच्या खुणा । आटव कोणा पहाण्याची ॥१७१॥

स्वप्नास जन आभास म्हणती । परी कधीं ये उलट प्रतीती ॥
तेच मुहूर्तीं रोगोच्छित्ती । दुःखनिवृत्ति पाटिला ॥ १७२ ॥

पाटील मनीं बहु धाला । कीं वाटे पुनर्जन्म झाला ॥
मग तो हळू हळू निघाला । दर्शनाला बाबांचे ॥ १७३ ॥

पाहोनि बाबांचे मुखचंद्रा । पाटिलाचे आनंद समुद्रा ॥
भरतें दाटलें आनंदमुद्रा । नयना तंद्रा लागली ॥ १७४ ॥

प्रेमाश्रूंचे वाहती लोट । पायांवरी ठेविलें ललाट ॥
बेत शासन हृदयस्फोट । परिणाम स्पष्ट सुखकारी ॥ १७५ ॥

या उपकारासीं उतराई । होईन मी पामर काई ।
हें तों अशक्य म्हणवून पाईं । केवळ डोई ठेवितों ॥ १७६ ॥

एणेंच माझी भरपाई । याहून अन्य उपाय नाहीं ॥
अचिंत्य अतर्क्य हे नवलाई । बाबा साई आपुली ॥ १७७ ॥

असो ऐसे पवाडे गात । पाटील महिना राहिले तेथ ॥
पुढें नानांचे उपकार स्मरत । होऊनि कृतार्थ परतले ॥ १७८ ॥

ऐसे ते भक्तिश्रद्धान्वित । पाटील आनंदनिर्भरचित्त ॥
साईकृपा कृतज्ञतायुक्त । वरचेवर येत शिरडीस ॥ १७९ ॥

दोन हात एक माथा । स्थैर्य श्रद्धा अनन्यता ॥
नलगे दुजें साईनाथा । एक कृतज्ञता ते व्हावी ॥ १८० ॥

होतां कोणी विपत्ग्रस्त । सत्यनारायणा नवसित ॥
तयाचें सांगव्रत आचरत । संकट निर्मुक्त होत्साता ॥ १८१ ॥

तैसेंच पाटील सत्य साईव्रत । तें पासाव करूं लागत ॥
प्रत्येक गुरुवारीं सदोदित । सुस्नात व्रतस्थ राहुनी ॥ १८२ ॥
जन सत्यनारायण कथा । पाटील अर्वाचिन भक्तलीलामृता ॥
दासगणूकृत साईचरिता । सप्रेमता वाचीत ॥ १८३ ॥
त्या पंचेचाळीस ग्रंथाध्यायीं । गणुदास भक्तां अनेकां गाई ॥
त्यांतील साईनाथ अध्याय त्रयी । सत्य साई कथा ती ॥१८४॥
व्रतांमाजी उत्तमव्रत । पाटीलही अध्यायत्रयी वाचित ॥
पावले सौख्य अपरिमित । स्वस्थ चित्त जाहलें ॥ १८५ ॥
आप्त इष्ट बंधू समेत । पाटील मिळवून सोयरे गोत ॥
करीत नेमें सत्य साईव्रत । आनंदभरित मानसें ॥ १८६ ॥
नैवेद्याची तीच सवाई । मंगलोत्सव तैसाची पाही ॥
तेथें नारायण येथें साई । न्यून नाहीं उभयार्थी ॥ १८७ ॥
पाटिलानें घातला पाठ । गांवांत पडला तोच परिपाठ ॥
या सत्य साईव्रताचे पाठ । लागोपाठ चालले ॥ १८८ ॥
ऐसे हे संत कृपाळ । प्राप्त होतां उदयकाळ ॥
दर्शनें हरिती भवजंबजाळ । काळही मागें परतविती ॥ १८९ ॥
आतां येथून पुढील कथा । वर्णील एकाची संतती चिंता ॥
संतासंतांची एकात्मता । चमत्कारता प्रकटेल ॥ १९० ॥

नांदेड शहरचा एक रहिवासी । मोठा श्रीमंत जातीचा पारसी ॥
मिळवील बाबांचे आशिर्वादासी । पुत्र पोटासीं येईल ॥ १९१ ॥
मौलीसाहेब तेथील संत । तयांची खूण बाबा पटवीत ॥
पारसी मग आनंदभरित । गेला परत निजग्रामा ॥ १९२ ॥

अति प्रेमळ आहे कथा । श्रोतां परिसिजे स्वस्थ चित्ता ॥
कळोन येईल साईची व्यापकता । तैसीच वत्सलता तयांची॥१९३॥

पंत हेमाड साईसी शरण । संतां श्रोतयां करितो नमन ॥
पुढील अध्यायीं हें निरूपण । सादर श्रवण कीजे जी ॥१९४॥

स्वस्ति श्रीसंतसज्जन प्रेरिते । भक्त हेमाडपंत विरचिते ॥
श्रीसाईसमर्थसच्चरिते । भीमाजीक्षयनिवारणं
नाम त्रयोदशोऽध्यायः ॥१९५॥

॥ श्री सद्गुरु साईनाथार्पणमस्तु । शुभं भवतु ॥



पौष-भारतमित्राचे संपादक रा. रा. नारायण भास्कर नाईक यांनी श्रावण महिन्याचा अंक ५ वा आमचेकडे पाठविला त्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत. मासिकाची वार्षिक वर्गणी अडीच रुपये आहे व तें रिवण-गोवा येथें प्रसिद्ध होतें.

# श्री साईनाथ भजनमाला

**सुधारून वाढविलेली आवृत्ति.**

मालेचे कर्ते रा. रघुनाथराव तेंडुलकर यांच्या निधनानंतर आतां मालेची पुनरावृत्ती छापविणें नाही. साईभक्तांनी माला मागविण्याची त्वरा करावी, कारण प्रती फारच थोडया शिल्लक राहिल्या आहेत.

सावित्रीबाई तेंडुलकर.

माला मिळण्याचा पत्ता:—

श्रीमति सावित्रीबाई तेंडुलकर,

रंगाऱ्याची चाळ, बांद्रें

बी. बी. सी. आय. रेल्वे.

शिर्डी येथील

श्रीसद्गुरु

# साईनाथ सगुणोपासना.

हें पुस्तक मूळ वे० सं० कृ० जा० भीष्म यांनी शके १८३३ त तयार केलें होतें. सांप्रत त्याची सुधारून वाढविलेली नवीन आवृत्ती छापण्यांत आली आहे.

श्रीसमर्थ साईनाथ महाराज यांच्या त्रिकाल आरतीचे वेळीं म्हटलीं जाणारी पद्यें, व भजनकाळीं म्हणावयाजोगीं सदर शास्त्री भीष्म यांनी तयार केलेलीं पद्यें, परापूजा व मानसपूजा यांचा या लहानशा पुस्तकांत संग्रह केला आहे. पुस्तकाची किंमत दोन आणे ठेविली आहे.

**हरि सिताराम दीक्षित**

पुस्तकें मिळण्याचें ठिकाण—श्री साईलीला ऑफीस.

**रा. रा. गोविंद रघुनाथ दाभोलकर.**

५ टर्नर रोड, बांद्रे.

**चिटणीस श्री शिर्डी संस्थान कमिटी**

शिर्डी, पो. राहते, जि. अहमदनगर.

---


# आख्यान–रत्न–माला, नांदेड.

या मालेंत अर्वाचीन कवींनीं रचलेलीं कीर्तनोपयोगी आख्यानें दिलीं जातील. ह. भ. प. संतकवी दासगणू महाराजांचीही प्रेमळ व प्रासादिक आख्यानें येतील.

वर्षांतून सहा पुस्तकें निघतील. पुस्तकाचा आकार डेमी अष्टपत्री. पृष्ठ सं. ४८ प्र. पु. किं. ८ आणे.

एक रुपया प्रवेश फी भरणारास पाऊणपट किंमतींत पुस्तक मिळेल.

एकदम सहा पुस्तकांची किं. प्र. पो. सह ३। रु.

**ग. अ. सराफ, नांदेड.**



हें पुस्तक श्रीलक्ष्मीनारायण छापखाना, ४०२ ठाकुरद्वार, मुंबई येथें **अनंत आत्माराम मोरमकर** यांनी छापून रा. आ. **तर्खड** यांनी ५ टर्नर रोड बांद्रे येथें प्रसिद्ध केलें.